REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
कार्यालय पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★. सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख १९ एप्रिल, १९४४ अंक १६

## प्रगतीचें श्रेय आपणांकडे

सह्याद्रि विमा कंपनीनें १९४३ सालीं खालीलप्रमाणें काम केलें आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| आलेलें काम | रु. ११, ४४, ४७१ | १९४२ | ५ लक्ष ३ हजारानें |
| मंजूर काम | रु. १८, ३५, ७१४ | पेक्षां | १ लक्ष १० हजारानें |
| पूर्ण विमा काम | रु. १६, १९, ७७५ | वाढ | ४ लक्ष ७ हजारानें |

या सर्व प्रगतीचें श्रेय कंपनीचे विमेदार, प्रतिनिधी, प्रचाराधिकारी, भागीदार व हितचिंतक यांनाच आहे व त्याच्याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहोंत. विमा—योजना त्याचप्रमाणें एजन्सी याच कंपनीची अत्यंत आकर्षक.

नासिक मॅनेजिंग डायरेक्टर,




## अन्न तुटवडा

सध्यां अन्न नियंत्रणामुळें जीवनास पुरेसें व चांगलें अन्न मिळत नाहीं. ही पडणारी तूट अन्नाचे गुणधर्म असलेल्या पेयानें भरून काढतां येईल.

## " गोल्डन कोको "

हें असें एक पेय आहे. त्यांत चहा—कॉफीचे दुष्परिणाम नाहींतच, पण अन्न या दृष्टीनें एक कप कोको दोन अंड्याचे बरोबर असल्याचें तज्ज्ञांचें मत आहे.

—सर्वत्र मिळतो—

कारखानदार : साठे कोको व चॉकोलेट फॅक्टरी, पुणें नं. २.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह-बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

→। दत्त कंपनी ।←
७२५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसचौकीजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर
रिपेअर करून मिळतील.

## विविध माहिती

### फिनले मटांतील गिरण्यांचा नफा

मेसर्स जेम्स फिनले अँड कं. लि. कडे मॅनेजिंग एजन्सी असलेल्या फिनले मिल्स लि. ला १९४३ सालीं ९९ लक्ष, ८९ हजार रुपये ठोक नफा झाला. भागीदारांस प्रत्येक भागास करमाफ २५ रुपये डिव्हिडंड मिळालें. प्रत्येक भाग १०० रुपयांचा आहे. १९३९ मध्यें नफ्याची रकम २,१४,५८० रुपये व डिव्हिडंडचा दर ५% होता. गिरणींत ४६,०७२ चात्या व ७८४ माग आहेत. परेळ येथें ही गिरणी आहे.

स्वान मिल्स लि. ला ६८ लक्ष रुपये नफा झाला. भागीदारांस प्रत्येक भागावर ( १०० रु. ) २५ रुपये करमाफ डिव्हिडंड मिळालें. १९३९ सालीं नफ्याची रकम १,२६,४५८ रुपये होती व डिव्हिडंडचा दर ५% होता. गिरणींत ३०,४२८ चात्या व ५१८ माग आहेत. न्यू सेवरी रोड येथें ही गिरणी आहे.

गोल्ड मोहोर मिल्स लि. नें १ कोटि, ४ लक्ष रुपये नफा दाखविला आहे. प्रत्येक १०० रुपयांच्या भागास करमाफ ४० रुपये डिव्हिडंड मिळालें. १९३९ सालीं गिरणीस ९३ लक्ष रुपये तोटा झाला होता व ताळेबंदाचे जिंदगीचे बाजूस ६४ लक्ष रुपये तोटा दिसत होता. गिरणींत ३७,७६८ चात्या व १०२० माग आहेत. ही गिरणी दादर येथें आहे.

### युद्धकार्यासाठी देणगी

अमेरिकेंतील ४० हजार लोकांनीं तेथील सरकारास युद्धकार्यासाठी ५० लक्ष डॉलर्सची देणगी दिली आहे.

### अपर सिंध लाइट रेल्वे

वरील रेल्वे ३१ मार्च १९४५ रोजीं सरकारच्या ताब्यांत जाणार आहे.

### दक्षिण ऱ्होडेशियाचें सोन्याचें उत्पादन

गेल्या वर्षी दक्षिण ऱ्होडेशियांत सोन्याचें उत्पादन ६,५६,००० औंस झालें. १९४२ चे मानानें हें उत्पादन १ लक्ष औंसांनीं कमी आहे.

### पंजाबी सैनिक

गेल्या महायुद्धाचे मानानें चालू युद्धास पंजाबनें दुप्पट सैनिक पुरवले आहेत. तथापि, नाविक व वैमानिक दलांत पंजाबी लोकांची संख्या अत्यल्प आहे.

### आस्ट्रेलियाचे ९० हजार सैनिक परतणार

बारा महिन्यांत आपले ९० हजार लोक सैन्यांतून काढून घेण्याचें ऑस्ट्रेलियाच्या सरकारनें ठरविलें आहे. ऑस्ट्रेलियांत मनुष्यबळाचा तुटवडा असल्यानें असें करणें आवश्यक झालें आहे.

### क्रोमिअमची तुर्कस्तानांतून जर्मनीकडे निर्यात

चालू युद्धास प्रारंभ झाल्यापासून तुर्कस्तानची जर्मनीकडील क्रोमची निर्गत तिपटीनें वाढली आहे. १९४२ मध्यें तुर्कस्तानें ३०,००० टन क्रोमिअम जर्मनीकडे पाठविलें. क्रोमिअम धातूचें इतर धातूंशीं मिश्रण सहज व चांगल्या तऱ्हेनें होतें व पोलादांत तें घातलें असतां पोलादाचा कडकपणा वाढतो.

### कपाशीची लागवड व उत्पादन

| | लागवड ( हजार एकर ) | उत्पादन ( हजार गाठी ) |
|---|---|---|
| १९४२-४३ | १८,८०४ | ४,४९२ |
| १९४३-४४ | १९,२६१ | ४,९३४ |
| वाढ | २% | १०% |

कपाशीच्या एकूण लागवडीपैकी २४·६% लागवड मुंबई प्रांतांत व १५·५% लागवड मध्यप्रांत-वऱ्हाडांत आहे. ह्या दोन्ही प्रांतांतील "अधिक धान्य पिकवा" मोहिमेमुळें १९४३-४४ मधील लागवड त्यापूर्वीच्या वर्षापेक्षा कमी असल्याचें आढळतें.

### इराणमध्यें सोन्याचें वाढतें महत्त्व

इराणमधील चलनास तेथील राजाचीं रत्नें-माणकें आधार असत. इराणच्या राष्ट्रीय बँकेच्या ताळेबंदांत त्यांची किंमत सुमारें २६½ लक्ष पौंड दाखविलेली आहे. त्यांची बाजारभावानें होणारी किंमत ह्यापेक्षा अर्थातच ज्यास्त आहे. रत्नें-माणकें ह्यांची जागा ह्यापुढें सोन्यास मिळणार आहे. दक्षिण आफ्रिका व अमेरिका येथून इराणमध्यें बऱ्याच सोन्याची आयात झालेली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या तेथील खर्चासाठी लागणारें चलन व्यवहारांत खेळतें रहातें तें खेचून घेण्यासाठीं हें सोनें तेथें पाठविण्यांत आलेलें आहे. लोक सोनें घेऊन तें कुलपांत टाकतात व अशा रीतीनें सोनें-विक्रीचा उद्देश सफल होतो.

### ग्रेट ब्रिटनमधील आयुर्विम्याचें काम

ग्रेट ब्रिटनमधील आयुर्विमा कंपन्यांनीं १९४३ मध्यें १९४२ चे मानानें ४% अधिक विम्याचें काम स्वीकारलें.

### ब्रिटिश हिंदुस्थानांतील विमा कंपन्यांस संस्थानांत सवलत

हिंदुस्थान सरकार आणि बडोदें, म्हैसूर व त्रावणकोर संस्थानें ह्यांचेमध्यें हिंदी विमा कायद्याच्या कांहीं बाबींसंबंधीं परस्पर व्यवस्था पुऱ्या झाल्या आहेत. ह्यापुढें ब्रिटिश हिंदुस्थानांतील विमा कंपन्यांनीं म्हैसूर व बडोदें संस्थानांत अनामत पैसे ठेवण्याचें कारण नाहीं. त्रावणकोरमध्यें आवश्यक असलेली डिपॉझिटची रकम थोडी कमी करण्यांत आली आहे. बाकी सर्व हिंदी संस्थानांत पूर्वीप्रमाणेंच डिपॉझिट्स ठेवावीं लागणार आहेत.

### हिंदी सैनिकांसाठी ब्राझीलचा तांदूळ

निर्गतीसाठीं ब्राझीलमध्यें तांदळाचीं ५० लक्ष पोतीं तयार आहेत. त्यांपैकीं बहुतेक तांदूळ हिंदी सैनिकांसाठी ग्रेट ब्रिटनकडे पाठविण्यांत येईल.

### रशिया-जपान करार इंग्लंड-अमेरिकेस अनुकूल

रशिया व जपान ह्यांचेमध्यें नुकताच एक करार झाला, तो अमेरिका व इंग्लंड ह्यांच्या हिताचाच आहे, असें अमेरिकेचे माजी असिस्टंट सेक्रेटरी ऑफ स्टेट हे म्हणाले.

### रिझर्व्ह बँकेच्या चलनी नोटा

रिझर्व्ह बँकेच्या चलनी नोटांपैकीं १० कोटि रुपयांच्या नोटा तिच्या बँकिंग विभागांत असून ८ अब्ज, ९३⅓ कोटि रुपयांच्या नोटा व्यवहारांत खेळत आहेत. ४४ कोटि, ४१ लक्ष रुपयांचें सोनें; ७ अब्ज, ८५ लक्ष रुपयांचे ब्रिटिश स्टर्लिंग रोखे; १६ कोटि रुपयांचीं नाणीं व ५८⅓ कोटि रुपयांचे हिंदुस्थान सरकारचे रोखे ह्यांचा वरील नोटांस आधार आहे.

### सरकारी रोख्यांची विक्री

२७ फेब्रुवारी, १९४४ ते ३१ मार्च, १९४४ अखेर मध्यवर्ती सरकारच्या कर्जरोख्यांत एकूण २०⅓ कोटि रुपये गुंतविले गेले.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | … १२३ |
| २ धान्याचा कीटकांपासून बचाव | … १२४ |
| ३ स्फुट विचार | … १२५ |
| गिरणी मालक संघाच्या अध्यक्षांचीं भाषणें— स्वदेशी कापड गिरण्या— युद्धाच्या अलीकडील हालचाली | |
| ४ कराराची पूर्तता अशक्य झाली | … १२६ |
| ५ व्यापारवृद्धीसाठीं चित्रपटांचा उपयोग | … १२६ |
| ६ मालतारणावर कर्जे देण्याचा धंदा | … १२७ |
| ७ चेकचे पैसे चुकून दिले, तर ! | … १२८ |



# अर्थ

बुधवार, ता. १९ एप्रिल १९४४


## ब्रिटिश बँकांची परिस्थिति आणि भवितव्य

(२)

युद्धसमाप्तीनंतरचीं कांहीं वर्षे, विशेषत: आर्थिक पुनर्घटना स्थिर पायावर उभी राहीपर्यंतचीं संधिकाळाचीं वर्षे व्यापार व उद्योगधंदे ह्यांस अडचणीचीं जाणार असल्याकारणानें ह्यापुढें उपस्थित होणाऱ्या परिस्थितीस ब्रिटिश बँकिंगनें कसें तोंड द्यावें ह्याविषयीं त्या धंद्यांतील पुढाऱ्यांनीं सूचनात्मक विचार व्यक्त केले आहेत. हिंदुस्थानच्या आर्थिक गरजा इंग्लंडच्या परिस्थितीशीं तुलना करतां अर्थातच भिन्न असल्याकारणानें ब्रिटिश बँकांपुढील प्रश्न आणि ते सोडवण्याचे मार्ग निराळे असणें स्वाभाविक आहे. तथापि, युद्धोत्तर काळांतील दोन्ही देशांमधल्या परिस्थितींत ब्रिटिश व हिंदी बँकांच्या व्यवहारास पुनर्घटनेच्या दृष्टीनें जें वळण द्यावें लागणार आहे त्यांत पुष्कळ साम्य अनुभवास आल्यावांचून रहाणार नाहीं. चलन, हुंडणावळ, बाजारभाव, सरकारी नियंत्रणें ह्यांची व्यवस्था युद्धसमाप्तीनंतर कशी राहील ? आज युद्धसामुग्री बनवणाऱ्या कारखान्यांतील भांडवल व कामकरी ह्यांचा उपयोग पुढें कसा होईल ? आर्थिक अभिवृद्धीच्या योजना कशा अमलांत आणल्या जातील ? परराष्ट्रीय व्यापारास कोणती नवी दिशा लागेल आणि परदेशी कारखान्यांची स्पर्धा स्वदेशी धंद्यांस किती सोसावी लागेल ? ह्यांसारखे अनेक प्रश्न येथें विचार करणारासमोर उभे राहतात आणि त्यांस निश्चित उत्तरें देणें कठिण आहे. ह्या प्रकारच्या अनिश्चित स्थितींतहि प्रत्येक धंद्यांतील पुढाऱ्यांनीं स्वत:च्या उद्योगाचा गाडा संक्रमणाच्या व पुनर्घटनेच्या काळांत सुरक्षित रीतीनें हाकला जाण्याची व्यवस्था दूरदृष्टीनें करणें अगत्याचें आहे. ह्या मार्गानें इतर धंदेवाल्यांच्या बरोबरीनें ब्रिटिश बँकर चालले आहेत आणि त्यांचें धोरण हिंदुस्थानांत स्वीकारलें जाणें इष्ट आहे.

जनतेच्या बचतीचा पैसा सुरक्षित राखून व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या व्यवहारासाठीं तो गरजू धंदेवाल्यांस पुरवणें हें बँकांचें मुख्य कार्य आहे आणि बदलत्या परिस्थितींतहि त्यांस तें करीत रहाणें शक्य आहे असा विश्वास मिडलंड बँकेचे अध्यक्ष मि. क्रिस्टोफर्सन ह्यांना वाटत आहे. कोणत्याहि धंद्याचें यश तो करणाराच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असतें आणि अशा व्यक्तींस त्यांची हानत व कार्यतत्परता पाहून व त्यांच्या मालकीच्या मालमत्तेवरच केवळ विसंबून न रहातां पैसा पुरवला गेल्यास उद्योगधंद्यांस लागणारें भांडवल उपलब्ध होईल आणि बँकांस धंदा मिळेल असें त्यांचें म्हणणें आहे. लॉइड्स बँकेचे लॉर्ड वॉर्डिंग्टन ह्यांनीं ही सूचना अधिक स्पष्ट करून मांडली आहे. युद्ध समाप्त होतांच भांडवलाच्या उपयोगावरचें सरकारी नियंत्रण एकदम सबंध काढून घेतलें जाणार नाहीं आणि औद्योगिक पुनर्रचनेमध्यें अनेक धंदेवाल्यांस पैसा लागेल आणि तो बँकांनी पुरवला पाहिजे असें मत व्यक्त करून ह्याकरितां सदरहू संस्थांनीं कर्जें देण्याविषयींचें मामुली धोरण बदललें पाहिजे असें त्यांनीं सुचवलें आहे. व्यापारी बँका उद्योगधंद्यांस चालू खर्चास लागणारा पैसा पुरवतात पण लांब मुदतपर्यंत यंत्रसामुग्री, इमारती इत्यादींमध्यें गुंतून रहाणारें भांडवलें धंदेवाल्यांस त्या कर्जाऊ देत नाहींत. त्यांच्याकडच्या ठेवी अत्यंत अल्प मुदतीच्या आणि केव्हांहि काढून घेण्यास पात्र अशा असल्यानें बँकांस आपल्या गिऱ्हाइकांस अल्प मुदतीचींच कर्जें द्यावीं लागतात. लांब किंवा मध्यम मुदतींत बँकांनीं दिलेल्या कर्जांचा पैसा गुंतून राहिला आणि ठेवीदार स्वत:च्या रकमा काढून घेऊं लागले तर ह्या संस्थांच्या मुळावरच घाव पडेल. म्हणून कर्जें देण्याचा बँकांचा सध्याचा प्रघात तत्त्वत: योग्य आहे; तथापि सध्या बँकांची सांपत्तिक स्थिति अत्यंत बळकटीची असून त्यांचेजवळ तरता पैसा भरपूर आहे. तेव्हां औद्योगिक पुनर्घटनेमध्यें चालू धोरणास थोडीशी मुरड घालण्यास हरकत नाहीं असा लॉर्ड वॉर्डिंग्टन ह्यांचा युक्तिवाद आहे.

ही विचारसरणी हिंदुस्थानांतील बँकांनीं नेहमींच लक्षांत बाळगण्याची आवश्यकता आहे, कारण स्वदेशी उद्योगधंद्यांच्या अल्पकाळांत येथें होतकरू धंदेवाल्यांस भांडवलाची नड तीव्रतेनें भासते. तथापि रिझर्व्ह व तरता पैसा ह्यांचें कर्जांशीं होणारें प्रमाण हिंदी बँकांनीं सतत नजरेपुढें ठेवून आपल्या जवळील ठेवींचा विनियोग करण्यावरच त्यांची सुरक्षितता अवलंबून रहाणार आहे. बँकांकडे ठेवी मोठ्या प्रमाणांत आल्या आहेत ह्याचें कारण लोकांस शिल्लकी पैशाचा उपयोग करण्यास पुरेसा वाव आज नाहीं हें होय. युद्ध संपल्यावर उद्योगधंद्यांस पैशाची गरज भासेल ती ह्या ठेवींतून आणि कर्जें रोख्यांच्या केलेल्या रोकडींतून प्रथम भागवली जाईल. धंदेवाल्या मंडळ्यांचे पैसे सरकाराकडे ठेव म्हणून आहेत, ते हळु हळु परत येतील आणि त्यांचा विनियोग पुनर्घटना व विस्तार ह्यांचेकडे प्रथम केला जाईल. त्या मर्यादेबाहेरची भांडवलाविषयींची मागणी भागवण्याची संधी बँकांस मिळेल आणि तिचा त्यांनीं पूर्ण फायदा घेतला पाहिजे. म्हणजे आज जो बँकांचा पैसा मामुली प्रमाणाबाहेर रोख्यांत गुंतला आहे तो धंदेवाल्यांस कर्जाऊ देतां येईल. युद्धसमाप्तीनंतर चलनाचें संकोचन करण्याची घाई सरकार करणार नाहीं आणि बाजारभाव व व्याजाचे दर स्थिर राखण्याचा तें प्रयत्न करील. संधिकाळांत भांडवलास जोराची मागणी येईल आणि सर्व स्थिरस्थावर होत असतां पुन्हां आर्थिक घडी हळु हळु बसेल. ह्या आंदोलनांत आर्थिक प्रगतीस सहाय देण्याचें कार्य बँकांस उपयुक्त रीतीनें करतां येण्याजोगें आहे आणि त्याकरितां त्यांनीं आपली सांपत्तिक स्थिति मजबुतीची करून ठेवणें आवश्यक आहे. अनेक वर्षांच्या अनुभवानें ब्रिटिश बँकांनीं स्वत:च्या धंद्याची इमारत बळकट करून ठेवली आहे हें ह्या देशांतील तत्सम संस्थांनीं ध्यानांत बाळगलें पाहिजे.

## धान्याचा कीटकांपासून बचाव

धान्यास कीड लागू नये म्हणून त्यांत राख मिसळणें किंवा त्यांत माती ठवणें हे उपाय आपल्या परिचयाचे आहेत. युद्ध-परिस्थितीमुळें धान्य साठविण्याची आवश्यकता भासूं लागताच निरनिराळ्या पदार्थांच्या भुकट्या या कामीं कशा वापरतां येतील याकडे शास्त्रज्ञांचें लक्ष लागलें आहे. भुकट्यांच्या योगानें कीटक मरतात ते कसें हा महत्त्वाचा प्रश्न आहे. कीटकांच्या श्वसनेंद्रिया-मध्यें या भुकट्या शिरल्यामुळें किंवा त्या कीटकांच्या पोटामध्यें गेल्यामुळें ते मरत असावे अशी समजूत होती. पण मृत कीटकांचें अंतरंग सूक्ष्मदर्शकाच्या योगानें तपासून पाहतां तशी वस्तुस्थिति नाहीं असें आढळून आलें. कीटक मरण्याचें कारण त्यांच्या अंगां-तील आर्द्रता भुकट्यांच्या योगानें नाहींशी केली जाते हें आहे. भुकट्यांमुळें हें कसें होतें हें जरी अजून नीटसें समजलेलें नाहीं, तरी कीटकांच्या शरीरावरील आवरणाशीं या क्रियेचा संबंध पोचतो हें सिद्ध झालें आहे. एखाद्या भुकटीच्या रासायनिक गुणधर्मापेक्षां भुकटीच्या कणांची कमी अधिक सूक्ष्मता, त्यांचा कठीणपणा किंवा मऊपणा व तिच्यावर केले जाणारे संस्कार यावरच तिची कार्यक्षमता मुख्यतः अवलंबून असते असें दिसून आलें आहे. दोन हजार वर्षांपूर्वीपासून अशा भुकट्यांचा उपयोग इजिप्शन लोक करीत आलेले आहेत. कीटकांच्या शरीराच्या घनफळाचे मानानें त्यांच्या आवरणाचें क्षेत्रफळ पुष्कळच ज्यास्त असतें व त्यामुळें कीटकांच्या अंगांतील आर्द्रता कमी होणें त्यांस घातुक ठरतें. विशेषतः कोरड्या अन्नावर रहाणाऱ्या कीटकांना आर्द्रतेची फारच आवश्यकता असते. भुकट्या ही आर्द्रता शोषून घेत नाहींत, परंतु पाण्याच्या बाष्पीभवनास त्या प्रवृत्त करतात. भुक-ट्यांमुळें कीटकांच्या कवचांस अपाय होतो, हेंहि खरें नाहीं; कारण कवचापेक्षा मऊ भुकट्याहि कीटकांस घातुक ठरतात असें आढ-ळून आलें आहे. फर्ग्युसन कॉलेजांतील डॉ. के. के. ढोळे यांनीं धान्य टिकविण्यासाठी धान्याच्या कांड्यांचा उपयोग शोधून काढला आहे त्यांचें वर्णन मुंबई विश्वविद्यालयाच्या मासिकांत पूर्वी आलेलें आहे, त्याचा येथें उल्लेख करणें आवश्यक आहे. अशा तऱ्हेच्या कीडनाशक भुकट्यांचा किडीवर कोणत्या प्रकारें परिणाम होतो, याची माहिती वर दिली आहे.

---

## शेअर बाजार

( ले. ब. वि. लोणकर, एम. ए., बी. कॉम. )

जपान्यांच्या आसाम मणिपूर प्रदेशावरील दडपणामुळें विशे-षतः टाटा स्टील, इंडियन आयर्न इत्यादि लोखंड पोलादाचे शेअर गडगडून खालच्या पातळीवर आले आहेत. पावसाळा सुरू होण्यास अवकाश असल्यानें तोपर्यंत आणखी हें दडपण बंगालचे दिशेनें वाढल्यास बाजार आणखी खालीं जातील हें सांगावयास नको. आतांपर्यंत कापड गिरण्या मात्र चांगल्याच टिकून राहिल्या आहेत. पण त्यांच्यांतहि सर्वसाधारण स्वरूपाची घसरण केव्हां येईल हें सांगतां येत नाहीं. गेलें अंदाजपत्रक व जपानची स्वारी या मह-त्त्वाच्या घटना होऊन सुद्धां भाव आहेत हे टिकून राहिलेत यावरून चलनाचा भावावर किती परिणाम होतो हें दिसून येईल. गिरण्यांचे भाव आणखी खालीं पडले तर गुंतविणारास कोहिनूर, गोकाक, विष्णु, मदुरा, कानपूर स्वदेशी, राजलक्ष्मी, इत्यादि शेअर उचलण्यास चांगलीच संधि मिळेल. साडेतीन टक्का कागद ९५-१४ पर्यंत खालीं येऊन पुन्हा ९६-११ पर्यंत वर आला हें थोडेसें सट्टेबाजांच्या हालचालींचेंच निदर्शक होय.

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
गोल्ड मेडॅलिस्ट व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट
पेन्टर वेडेकर, ए. जी.,
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

प्रगतिपथावरील नवा
मै ला चा — द ग ड
सन १९४३ अखेर
नव्या कामांत १९० टक्के वाढ
चालू कामांत १०० टक्के वाढ
आयुर्विमानिधींत ८० टक्के वाढ
— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —
दि औंध म्यूच्युअल लाइफ
ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.
आर. जी. साठे — सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी, — मॅनेजिंग डायरेक्टर

रक्तवर्धक प्रमाणेंच लोकप्रिय
दोन उपयुक्त औषधें.
ओजस
पौष्टिक पेयान्न
आबाल वृद्ध स्त्रीपुरुषांस उपयुक्त
मुलांचे करितां
ॲंटी ग्राइप मिक्श्चर
दांत सुलभतेनें येण्यावर व मुलांचे अपचनाचे विकारावर
केंद्रे:-मुंबई, पुणें, नागपूर, उमरावती, सांगली, कोल्हापूर, हुबळी.
पुणें मुख्य दुकानः—गणपती चौक, लक्ष्मीरोड पुणें.
आयुर्वेद रसशाळा
पुणें लि० पुणें ४.

# स्फुट विचार

### गिरणी-मालक संघांच्या अध्यक्षांचीं भाषणें

मुंबई आणि अहमदाबाद येथील गिरणी मालकांच्या संघांच्या वार्षिक सभा गेल्या आठवड्यांत भरल्या आणि त्यांमध्यें ह्या संस्थांच्या अध्यक्षांनीं कापडाच्या गिरण्यांचे धंद्याची सद्यःस्थिति व त्यांच्यापुढें असलेले प्रश्न ह्यांचे बाबतींत भाषणें केलीं. कापडाचे भाव अलीकडे उतरले असल्याबद्दल दोघांनीं समाधान व्यक्त केलें आणि कांहीं गिरणीवाले व व्यापारी वाजवीपेक्षा अधिक भावानें कापड विकीत असल्याविषयीं खेद प्रदर्शित केला. सरकारी भावनियंत्रण अशा रीतीनें पायावर बसवलें जावें आणि त्यासंबंधांत जबाबदार गिरणीवाल्यांच्या पुढाऱ्यांनीं निषेध करण्यापर्यंत मजल यावी ही गोष्ट खेदजनक आहे. अलीकडे हिंदी गिरण्यांस चांगला फायदा मिळत असला तरी त्यांच्या भवितव्याविषयीं जागरूकपणानें योजना आखण्याचें महत्त्व दोन्ही अध्यक्षांनीं प्रतिपादिलें. अहमदाबाद गिरणी मालकांच्या संघाचे अध्यक्ष, श्री. साकरलाल बालाभाई ह्यांनीं सांगितलें कीं, सध्याच्या युद्धकाळांतली एकंदर परिस्थिति गेल्या युद्धापेक्षां सर्वस्वी भिन्न असल्यानें आतां केवळ राजकीय नव्हे तर आर्थिक कल्पना व घटना ह्यांचा फेरविचार व पुनर्रचना करणें अगत्याचें झालें आहे. ह्यासाठीं व्यक्तिशः आणि सघाईक रीतीनें विचार करून पुनर्घटनेची योजना आखण्याचें कार्य लोकांनीं हातीं घ्यावें असें त्यांनीं सुचवलें. मुंबईच्या संघाचे अध्यक्ष, सर विठ्ठल चंदावरकर, ह्यांनीं कोळशाच्या तुटवड्याचा परिणाम गिरण्यांच्या उत्पादनावर कसा प्रतिकूल होत आहे हें सांगितलें आणि सरकारनें ह्यासंबंधांत जरूर ती व्यवस्था करून कोळशाच्या पुरवठ्याचें निश्चित आश्वासन द्यावें असें सांगितलें.

---

### स्वदेशी कापड-गिरण्या

प्रत्येक स्वदेशी धंद्याच्या चालकांनीं युद्ध चालू असतां त्याचे स्वतःच्या उद्योगावर होत असलेले परिणाम लक्षांत घ्यावयाचे असतात, त्याचप्रमाणें युद्धसमाप्तीनंतर उद्भवणाऱ्या परिस्थितींत त्याचा योगक्षेम कसा चालेल ह्याचाहि विचार करणें इष्ट असतें. मुंबईच्या कापड-गिरण्यांच्या संघाचे अध्यक्ष, सर विठ्ठल चंदावरकर, ह्यांनीं ही दुसरी कामगिरी चांगली बजावली आहे. युद्ध संपतांच जगांतील राष्ट्रांस कापड पुरवण्याची जबाबदारी इंग्लंड, अमेरिका व हिंदुस्थान ह्या देशांवर येऊन पडेल आणि कापडाची वाटणी नियंत्रित योजनात्मक पद्धतीनें सर्व देशांत करावी लागेल. ह्यासाठीं हिंदी गिरण्यांचें उत्पादन युद्धसमाप्तीनंतर कमाल प्रमाणांत केलें जावें ह्याकरितां सरकारनें आवश्यक असलेलें सहाय दिलें पाहिजे असें त्यांनीं सुचवलें आहे. जागतिक शांतता प्रस्थापित झाल्यानंतर स्वदेशी गिरण्यांनीं कोणतें व किती कापड काढावें आणि त्यासाठीं कोणती यंत्रसामुग्री लागेल ह्याचा विचार गिरणीवाल्यांनीं करावा अशी त्यांची दुसरी सूचना आहे. गिरण्यांस लागणारीं यंत्रें ह्या देशांत बनवलीं जाण्याची व्यवस्था करण्याच्या महत्त्वावरहि त्यांनीं जोर दिला. युद्ध संपतांच यंत्रसामुग्रीस फार मोठी मागणी येईल आणि गिरण्यांस पाहिजे असलेलीं यंत्रें वेताच्या किंमतीनें मिळणें कठिण होईल ह्या गोष्टीकडे त्यांनीं लक्ष वेधलें. सरकारनें यंत्रसामुग्रीच्या खरेदीचे कामीं सहाय करावें असें ते म्हणाले. कामकरी वर्गांच्या रहाणींत सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न सरकारनें चालवले आहेत त्यांस अनुलक्षून सर विठ्ठल म्हणाले कीं, हिंदी कापडाच्या गिरण्यांचे मुख्य गिऱ्हाइक शेतकरी आहेत आणि त्यांची प्राप्ती वाढवण्याची कसून खटपट केल्यावांचून कारखान्यांतील मजुरांच्या आर्थिक स्थितीचा प्रश्न हातीं घेणें हें एकांगीपणाचें व चुकीचें धोरण आहे. शेती सुधारणा अगत्याची आहे, ह्याविषयीं दुमत नाहीं, पण ती घडून येईतोंपर्यंत गिरणी कामगारांच्या रहाणींत सुधारणा केली जाऊं नये असें सुचवणें चमत्कारिक आहे.

---

### युद्धाच्या अलीकडील हालचाली

युरोपांत पूर्वेकडील आघाडीवर रशियन सेनापतींचे जर्मन फौजांस मागें हटवीत त्यांच्या देशांच्या सरहद्दीपर्यंत रेटण्याचे प्रयत्न विलक्षण रीतीनें यशस्वी झाले आहेत. ह्या आघाडीच्या मध्याचे व विशेषतः दक्षिणेचे बाजूकडे जर्मन सैन्यें रशियन रगाड्यांत कोठेंच टिकाव धरूं शकलेलीं नाहींत आणि त्यांस हटतां हटतां पुरेवाट झाली आहे. क्रायमियाचें द्वीपकल्पहि सोडणें त्यांस भाग पडत आहे आणि रशियन सैन्यें रूमानिया व हंगेरी ह्या जर्मनीच्या दोस्तांच्या देशांत घुसूं पहात आहेत. ब्रिटिश व अमेरिकन वैमानिक दलांचे हल्ले अलीकडे विशेष विस्तृत आणि हानिकारक होत आहेत आणि त्यांचें अप्रत्यक्ष रीतीनें रशियन चढाईस सहाय होत आहे. युगोस्लाव्हियासारख्या जर्मनव्याप्त देशांत स्थानिक चळवळी जर्मनीविरुद्ध बळावत आहेत. ह्याच स्थितींत युरोपांत चालू व्हावयाच्या दुसऱ्या आघाडीचा क्षण जवळ येत आहे असें सांगण्यांत आलें असल्यानें जर्मनीचा कोंडमारा होत चालला आहे ह्यांत शंका नाहीं. इटलींत मित्रराष्ट्रांच्या युद्धाचा डाव पुढें सरकत नसला तरी तेथें जर्मनीची मोठी सेना गुंतून पडली आहे आणि त्या योगानें रशियन व पश्चिम आघाडीचा मार्ग सुलभ झाला आहे. आसामच्या आघाडीवर जपानी फौजा प्रथम झपाट्यानें आंत घुसल्या असल्या तरी त्यांच्या पुढील हालचाली कुंठित केल्या जात आहेत आणि दळणवळणाचे मार्ग तोडण्याचा जपानी प्रयत्नांचा प्रतिकार केला जात आहे. सर सेनापती, लॉर्ड लुई मौंटबॅटन, ह्यांनीं आपलें ठाणें दिल्लीहून सिलोनला बदललें आहे ह्यावरून मि. चर्चिल ह्यांनीं अलीकडे उल्लेखिलेल्या जपानविरुद्ध व्हावयाच्या आरमारी चढाईची मित्रराष्ट्रांची तयारी चालू झाली आहे असें उघड होतें. ह्यासंबंधांत सिलोनमधील बंदरें सोयीचीं व मोक्याचीं आहेत. पॅसिफिक महासागरांतील जपानच्या ताब्यांतील बेटांमध्यें अमेरिकन सैन्यें व विमानदलें ह्यांस चांगलें यश मिळत आहे आणि ह्या रीतीनें जपानभोंवतीं आक्रमणाचा पाश हळू हळू पण पद्धतशीरपणानें आवळला जात आहे. जपाननें मणिपूरमध्यें थोडी चढाई चालवली आहे पण प्रत्यक्ष ब्रह्मदेशांत ह्या उपक्रमाच्या पिछाडीस उत्तर, मध्य व दक्षिण भागांत त्याच्या विरुद्ध चाललेल्या चढायांची प्रगति आहे ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

---

### ओरिएंटल विमा कं. लि.

ओरिएंटल विमा कंपनीनें १९४३ सालीं १५ कोटि रुपयांचें काम पुरें केलें. १९४२ चे मानानें हा आकडा ५३ कोटि रुपयांनीं मोठा आहे.

## युद्धामुळें कराराची पूर्तता अशक्य झाली

### मुंबई हायकोर्टाचा निवाडा

दोन लक्ष रुपये किंमतीच्या, ऑइल रिफायनिंग व हैड्रोजनेटिंगची यंत्रसामुग्रीसाठी दोन जर्मन कंपन्यांशीं गोविंद्राम सक्सेरिया ह्या फर्मनें करार केला होता. पुढें त्या फर्मनें ह्या करारांतील हितसंबंध भारत वनस्पति प्रॉडक्ट्स लि. ला विकले. जर्मन कंपन्यांच्या मालमत्तेची मालकी कस्टोडियन ऑफ एनिमी प्रापर्टीकडे गेली. त्याचें म्हणणें असें की, जुलै १९३९ मध्यें यंत्रसामुग्रीपैकीं नऊदशांश माल मुंबईत दाखल झाला व प्रतिवादींकडून ९६ हजार रुपये घेऊन तो त्यांस देण्यांत आला. दिलेल्या मशिनरीची किंमत १ लक्ष ८१ हजार रुपये होती. युद्ध सुरू झाल्यामुळें यंत्रसामुग्री पुरविण्याचा करार रद्द झाला, तेव्हां कॉन्ट्रॅक्ट ॲक्टाच्या ६५ व्या कलमानुसार वादीचा (कस्टोडिअन ऑफ एनिमी प्रॉपर्टी) पुरविलेल्या मशिनरीची येणें रकम (८७ हजार रुपये) त्यास मिळावी, असा गोविंद्राम सक्सेरिया व भारत वनस्पति प्रॉडक्ट्स लि. ह्यांवर दावा होता. पुरविलेली मशिनरी अपुरी असल्याकारणानें ती कुचकामाची ठरली, तेव्हां वादीनेंच नुकसानभरपाई भरून द्यावी, असें प्रतिवादीनें सांगितलें. वादी अथवा प्रतिवादी ह्यांपैकीं कोणाचाच फायदा झाल्याचें सिद्ध झालें नाहीं, ह्या कारणास्तव हायकोर्टानें दावा काढून टाकला. कांहीं अनपेक्षित व आवाक्याबाहेरील परिस्थितीमुळें कराराची पूर्तता करतां आली नाहीं, तर त्या करारामुळें कोणाचाहि कांहीं फायदा झाला असल्यास त्यानें तो परत दिला पाहिजे, असा कराराचा कायदा आहे, व त्या कायद्यास अनुसरून वादीनें वरील दावा आणला होता. परंतु, प्रतिवादीस मशिनरी मिळाली तरी ती निरुपयोगी ठरल्यामुळें, प्रतिवादीचा फायदा झाल्याचें सिद्ध होऊं शकलें नाहीं. त्याचप्रमाणें वादीचाहि कांहीं फायदा झाला असल्याचें सिद्ध झालें नाहीं. म्हणून हायकोर्टानें दोन्ही पक्षांचीहि मागणी अमान्य ठरविली. वादीचे हातीं मशिनरीची पुरी किंमत आली नाहीं व प्रतिवादीचें हातीं आलेली मशिनरी निरुपयोगी असल्यामुळें दिलेली रकमहि वाया गेली, अशा परिस्थितींत कोणाचाच अवास्तव फायदा झाला नाहीं असें हायकोर्टास आढळून आलें.

---

### व्यापारवृद्धीसाठी चित्रपटांची मदत

चित्रपटांचा ब्रिटिश मालाची निर्गत वाढविण्याकडे कसा उपयोग करून घेतां येईल, ह्याची चर्चा मिस मेरी फील्ड ह्यांनीं इन्स्टिट्यूट ऑफ एक्सपोर्टच्या सभेंत नुकतीच केली. युद्धापूर्वी रुमेनियांत एका विशिष्ट प्रकारच्या शिवण्याच्या यंत्रांस मागणी आली, त्याचें मूळ अमेरिकन प्रचार पटांत आढळलें; त्याचप्रमाणें ब्रह्मदेशांत अमेरिकन जाहिरातीच्या फिल्ममध्यें शेतीस कृत्रिम खतांचा कसा उपयोग होतो हें दाखविण्यांत आलें त्याचा परिणाम ह्या खतांचा खप वाढण्यांत झाला, असें मिस फील्ड ह्यांनीं सांगितलें. "आमचा माल वापरा" अशा प्रकारच्या जाहिरातींपेक्षा अप्रत्यक्ष रीतीनें मालास मागणी निर्माण करण्याची अमेरिकन कला चांगली आहे, असें सांगून ब्रिटिश साम्राज्यांत आपण त्याचें अनुकरण केलें पाहिजे, असें त्या म्हणाल्या. लघुपटांचे निर्मिति व निर्गत व्यापारी ह्यांच्या संस्थांमध्यें सहकार्य वाढवून ही गोष्ट सहज घडवून आणतां येईल, असें सुचवून आरोग्याच्या काळजीबाबत चित्रपट दाखवून टुथपेस्ट वगैरेंचा खप कसा वाढवितां येईल, ह्याचें दिग्दर्शन त्यांनीं केलें. युद्धोत्तर काळांत पुढारलेले देश आपला माल इतर देशांत खपविण्यासाठी कसा युक्तीचा व पद्धतशीर प्रयत्न करतील, ह्याचें वरील हें केवळ एक उदाहरण आहे. त्यावरून, हिंदुस्थानापुढें येणाऱ्या बिकट प्रश्नाचें स्वरूप चांगलें ध्यानांत येईल.


## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबई शाखा : हमाल स्ट्रीट, फोर्ट.
जळगांव शाखा : नवी पेठ, मेन रोड.
नागपूर शाखा : गोखले बिल्डिंग, सिताबर्डी.

भांडवल

| अधिकृत व विक्रीस काढलेलें | खपलेलें | वसूल झालेलें |
| --- | --- | --- |
| रु. १०,००,००० | रु. १०,१०,००० | रु. ४,९६,१७० |

एकूण खेळतें भांडवल रु. ७४,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेनें रु. ५ प्रीमिअमनें काढलेले सर्व शेअर्स विकले गेले. विशेष माहितीसाठी भेटा अगर लिहा.

सी. व्ही जोग,
B. Com., C. A. I. B., C. A. I. I. B.
मॅनेजर

## जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा मढविला जातो त्यामुळें दागिना कधींही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं., सांगली, S. M. C.
भट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

पुण्यांतील
## आदर्श निवासस्थान व भोजनालय
## छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

मलेरियावरील क्रांतिकारक हिंदी शोध
## मागोरा पिल्स
अवघ्या ४ दिवसांत मलेरिया थांबतो.
१६ गोळ्यांच्या डबीस रु. १
— १०० गोळ्यांचें पॅकिंगही मिळतें. —
मागोरा केमिकल कं. लि.
टिळक रोड, पुणें २.

## लहान गावांतील बँकांचा मालतारणावर कर्जे देण्याचा धंदा

आपल्या ठेवीदारांकडून कमी व्याजाचे दरानें घेतलेल्या ठेवी आपल्या गावीं सुरक्षित रीतीनें व किफायतशीर दरानें गुंतवण्याचे दृष्टीनें व्यापाऱ्यांना मालतारणावर कर्जे देणें हा एक उत्तम मार्ग आहे. व्यापाऱ्यानें सुगीच्या दिवसांत घेतलेल्या मालास अधिक किंमत येण्याचे दृष्टीनें तो माल कांहीं दिवस ठेवून टाकणें आवश्यक असतें व त्या मालांत गुंतलेला पैसा त्याच मालावर कर्ज काढून दुसऱ्या व्यवहाराकरितां मोकळा करावा लागतो व अशा तऱ्हेनें लागणारा पैसा हुकमी रीतीनें पुरवणें बँकांना शक्य असतें.

ज्या व्यापाऱ्यास अगर इसमास कर्ज द्यावयाचें त्याची जिंदगी किती आहे, त्यास किती रक्कम दिली असतां त्यानें ताब्यांत दिलेल्या मालाचे किंमतींत कितीहि चढउतार झाला असता देखील त्याची फेड बिनतक्रार होऊं शकेल इत्यादि गोष्टी लक्षांत घेऊन त्यास द्यावयाच्या कर्जाची जास्तींत जास्त मर्यादा ठरवतात व त्या मर्यादेच्या आंत त्यास वेळोवेळीं त्याला जरुर लागेल त्याप्रमाणें त्याचेकडून माल तारण घेऊन भावाच्या चढउताराकरतां योग्य फूस ठेवून त्यास कर्ज देतात. अर्थात त्यानें ताब्यांत माल देतेवेळीं त्या मालाचा विमा उतरलेला आहे कीं नाहीं, तो माल ज्या गोडाउनमध्यें ठेवला आहे तेथें तो सुरक्षित राहूं शकेल किंवा नाहीं, तें गोडाउन योग्य तऱ्हेनें त्याच्या ताब्यांत आलें आहे किंवा नाहीं, तो माल त्याचाच आहे किंवा कसें, शिवाय, त्या गोडाउनजवळ अपघातानें आग वगैरे लागल्यास ती विझविण्याची व्यवस्था केली आहे कीं नाहीं इत्यादि गोष्टींची चौकशी व खात्री योग्य ते कागदपत्र पाहून करावी लागते. ही चौकशी इतक्या सहज रीतीनें व कौशल्यानें केली पाहिजे की त्यायोगें त्या इसमास कोणत्याही तऱ्हेनें आपणाविषयीं तिरस्कार अगर अपमान वाटतां कामा नये. शहरांतील व्यापाऱ्यांना बँकांकडून कर्ज काढण्याची पद्धत लागून गेली असल्यामुळें त्यांना अशा चौकशीचें विशेष कांहीं वाटत नाहीं पण जेथें या पद्धतीचा फारसा प्रचार नाहीं तेथें अशा तऱ्हेनें चौकशी करणें व्यापाऱ्यांना कमीपणाचें वाटतें व केवळ अशा बाबतींत थोडासा मतभेद झाल्यामुळेंच कित्येक व्यापाऱ्यांनीं कर्जेंच घ्यावयाचीं नाकारल्याचीं उदाहरणें आहेत.

त्याचप्रमाणें दुसरी गोष्ट ऑफिसच्या वेळेसंबंधीं. शहरांतील बँकांना ऑफिस टाइममध्येंच सर्व कामें उरकतां येतात; परंतु लहान गावांतील बँकांना ऑफिसच्या वेळेच्या बाबतींत इतका काटेकोरपणा करून भागत नाहीं. याचा अर्थ असा नव्हे कीं, बँकांनीं केव्हांही आपले व्यवहार करावेत.

एक तर लहान गावांत शहराप्रमाणें व्यापाऱ्यांचे सर्व व्यवहार अमुक वेळींच होतात असें नाहीं. व्यवहार थोडे व स्पर्धा जास्त, यामुळें अमेल त्यावेळीं आपले व्यवहार उरकून टाकावयाची त्यांची प्रवृत्ति असते. एकादेवेळीं बँक सुरू होण्याचे थोडा वेळ आधींच अगर बंद झाल्यावर त्यांना त्यांचे खात्यांतील रक्कम काढण्याची जरुरी पडते. अशा वेळीं त्यांच्या चेकचे पैसे देणेंही कित्येक वेळा आवश्यक असतें. अशा वेळीं ज्यानें चेक काढला असेल त्यासच त्या चेकचे पैसे दिले तर 'स्टॉप पेमेंट' वगैरे भीती राहणार नाहीं व त्या इसमाचेंही काम होईल. अर्थात अशा गोष्टी वारंवार करणें केव्हांही चांगलें असणार नाहीं.

लहान गावांतील बँकांचे व त्यांच्या खातेदारांचे हरघडी येणारे जिव्हाळ्याचे प्रसंग व बँकिंगच्या व्यवहाराची आवड निर्माण करण्याची जरूरी इत्यादी गोष्टी लक्षांत घेऊनच अशा तऱ्हेचीं बंधनें बँकांना थोडीशीं ढिलीं करावीं लागतात व अशा तऱ्हेचीं बंधनें थोडीशीं ढिलीं केल्यानेंच लहान गांवांतील लोकांना देखील बँकेशीं व्यवहार करण्याची गोडी लागून तेथें बँकेच्या धंद्यास अधिकाधिक क्षेत्र मिळत असल्याचें अनुभवास येतें.

ह. वा. सहस्रबुद्धे.

---

## चेकचे पैसे चुकून दिले, तर बँकेस ते वसूल करतां येत नाहींत

मेसर्स सुखदेव सिंह ज्योतिप्रसाद यांनीं मर्कंटाइल बँक ऑफ इंडिया लि. दिल्ली या बँकेंत ओव्हरड्राफ्टची व्यवस्था केली. १४ सप्टेंबर, १९२२ रोजीं त्यांनीं बँकेवर पंजाब इंडस्ट्रिअल एजन्सी लि. च्या नांवें एक चेक काढला, परंतु हा चेक बँकेकडे पोचण्यापूर्वींच ३ जानेवारी १९२३ रोजीं चेकचे पैसे न देण्याविषयीं बँकेस कळविलें. ३ फेब्रुवारी, १९२३ रोजीं पंजाब इंडस्ट्रीअल एजन्सीनें बँकेंत चेक दाखल केला व चेकचे पैसे न देण्याविषयींची सूचना विसरली जाऊन बँकेनें चेकची रक्कम दिली. १९ मार्च रोजीं बँकेला आपली चूक कळून आली व तिनें पंजाब इं. एजन्सीकडे चेकचे पैसे परत मागितले, ते एजन्सीनें देण्याचें नाकारलें व बँकेनें पैशाच्या वसुलीसाठी दावा लावला. खालच्या व अपील कोर्टानीं बँकेतर्फे निवाडा केला, तेव्हां लाहोर हायकोर्टांत प्रकरण गेलें. "चेक धारण करणारास त्याचे पैसे मिळाले, म्हणजे चेक लिहिणारानें त्याचे पैसे दिले असाच अर्थ होतो. येथें तर मेसर्स सुखदेव सिंह ज्योतिप्रसादच्या खातीं पंजाब इ. एजन्सी लि. नें चेकची रक्कम जमा केली आहे. ज्यास रकम मिळावयाची होती, त्यासच ती मिळालेली आहे व कांहीं चूक झाली असल्यास ती बँकेचीच आहे." असा हायकोर्टानें निवाडा करून अर्जदार पंजाब इंडस्ट्रिअल एजन्सी लि. चा सर्व खर्च भरून देवविला.

---


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा : पुणें कॅन्टोन्मेंट, बारामती

पे-ऑफिस : खोपोली

—: खेळतें भांडवल रु. १९ लाखांचे वर :—

कळविण्यास आनंद वाटतो कीं, दि. २५–३–४४ रोजीं गुढीपाडव्याचे सुमुहूर्तावर बँकेची शाखा लोणावळा येथें उघडण्यांत आली.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

मॅनेजिंग डायरेक्टर्स

## पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779

GUEST HOUSE

TELEGRAM Guest House Poona 2.

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

## ☆ नगर बॉंबे ट्रेडिंग कंपनी ☆

चिनाब, लाइम ज्यूस कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्क्वॅश, टोमॅटो सॉस मॅंगो जॅम, मध, कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॉवेलस्, टुथ पेस्ट, टुथ ब्रश, वगैरे मालाचे स्टॉकिस्ट.

शाखाः— माणिक चौक, अहमदनगर.

हेड ऑफिसः— पूना गेस्ट हाऊस, पुणें २

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणींचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स

★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे

मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७/११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.